ऑक्सफर्ड लशीच्या चाचण्यांसाठी सिरम इन्स्टिट्यूटला परवानगी

वृत्तसंस्था, नवी दिल्ली



भारताच्या औषध महानियंत्रकांनी पुण्याच्या सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया या संस्थेस ऑक्सफर्ड विद्यापीठाने तयार केलेल्या लशीच्या दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यातील मानवी चाचण्या करण्यास हिरवा कंदील दाखवला आहे.

ऑक्सफर्ड लशीवर ब्राझील आणि इतर काही देशांत चाचण्या झाल्या असून प्राथमिक पातळीवर ती करोनाविरोधी प्रतिपिंड तयार करण्यात यशस्वी ठरली आहे. या लशीमुळे प्रतिकारशक्ती प्रणालीतील टी पेशींचीही निर्मिती होते.

सरकारी अधिकाऱ्यांनी पीटीआयला सांगितले की, टप्पा २ व ३ मधील महत्त्वाच्या चाचण्या करण्याची परवानगी सिरमला देण्यात आल्याचे औषध महानियंत्रक डॉ. व्ही. जी. सोमाणी यांनी जाहीर केले आहे. विषय तज्ञ समितीने या बाबत शिफारशी केल्या होत्या. चाचणीनंतर या लशीबाबतच्या सुरक्षिततेची माहिती सुरक्षा देखरेख मंडळाला टप्पा तीन सुरू करण्यापूर्वी सादर करावी लागणार आहे.

एका व्यक्तीला दोन डोस चार आठवड्यांच्या अंतराने देण्यात येणार असून पहिला डोस दिल्यानंतर दुसरा डोस २९ व्या दिवशी द्यावा लागेल. त्यानंतर सुरक्षा व प्रतिबंधात्मक माहिती हाती येईल. ऑक्सफर्ड विद्यापीठाने टप्पा १ व २ मधील जे निष्कर्ष जाहीर केले आहेत त्यांची माहिती शुक्रवारी केंद्रीय औषध नियंत्रण संघटनेसमोर मांडण्यात आली. त्यानंतर टप्पा २ व टप्पा ३ च्या चाचण्यांना परवानगी देण्यात आली.

सिरम इन्स्टिट्यूटने आधी केलेल्या अर्जावर मागवण्यात आलेली अधिक माहिती सादर केल्यानंतर आताचा निर्णय घेण्यात आला असून सुधारित प्रस्तावानुसार १८ वर्षांवरील १६०० लोकांवर चाचण्या करण्यात येणार असून सतरा निवडक ठिकाणी त्या केल्या जातील. यात दिल्लीतील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था, पुण्याचे बी. जे. मेडिकल कॉलेज, पाटण्यातील रीसर्च इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस, चंडीगड येथील पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल एज्युकेशन अँड रीसर्च, जोधपूर येथील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था, गोरखपूरचे नेहरू हॉस्पिटल, विशाखापट्टनमचे आंध्र मेडिकल कॉलेज, म्हैसुरूची जेएसएस अॅकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन अँड रीसर्च यांचा समावेश आहे. सिरमची ॲस्ट्राझेन्का कंपनीसमवेत लसनिर्मितीत भागीदारी आहे.

'कुलभूषण जाधव यांच्यासाठी वकील नेमण्याची संधी भारताला द्या'

इस्लामाबाद : पाकिस्तानातील एका लष्करी न्यायालयाने मृत्युदंडाची शिक्षा सुनावलेले भारतीय नागरिक कुलभूषण जाधव यांच्यासाठी वकील नेमण्याकरिता भारताला आणखी एक संधी द्यावी, असा आदेश इस्लामबाद उच्च न्यायालयाने सोमवारी दिल्याचे पाकिस्तानी माध्यमांनी म्हटले आहे.

पाकिस्तान सरकारने केलेल्या या याचिकेची मुख्य न्यायाधीश अथर मिनाल्ला व न्या. मियाँगुल हसन औरंगजेब यांनी सुनावणी केली. आयसीजेच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत आपली जबाबदारी पूर्ण करता यावी म्हणून जाधव यांच्यासाठी वकील नेमावा, अशी विनंती सरकारने इस्लामाबाद उच्च न्यायालयाला केली. फेरविचार याचिकेबाबतच्या निर्णयाबद्दल भारत सरकार किंवा जाधव यांनी पुन्हा विचार करावा, तसेच वकील नेमण्यासाठी भारताला एक संधी दिली जायला हवी, असे मत न्यायाधीशांनी व्यक्त केले. त्यावर, या संदर्भात आम्ही परराष्ट्र कार्यालयामार्फत भारताशी संपर्क साधू, असे ॲटर्नी जनरल यांनी सांगितले.

'स्पेस एक्स'ची अवकाशकुपी सुखरूप परत

खासगी अवकाश पर्यटनाची नांदी

वृत्तसंस्था, केप कॅनव्हरॉल

अमेरिकेतील उद्योगपती इलन मस्क यांच्या स्पेस एक्स कंपनीच्या ड्रॅगन (आता एंडेव्हर) अवकाशकुपीच्या माध्यमातून अवकाशात गेलेले नासाचे दोन अवकाशवीर रविवारी सुरक्षितपणे पृथ्वीवर आले. या मोहिमेने अवकाश प्रवासाचे खासगीकरण होण्यात महत्त्वाचे पाऊल पडले आहे. पुढील वर्षी खासगी अवकाश पर्यटन सुरू होणार असल्याची चिन्हे आहेत.

नासाने त्यांच्या अवकाशवीरांना अवकाश स्थानकात नेण्याआणण्याचे कंत्राट आता स्पेस एक्स कंपनीला दिले आहे. बोईंग कंपनीला ही संधी देण्यात आली होती पण त्यांना तसे अवकाशवाहन तयार करण्यात तातडीने यश मिळवता आले नाही. ही अवकाशकुपी दोन महिन्यांपूर्वी फ्लोरिडातून सोडण्यात आली होती व ती अवकाशस्थानकाजवळ गेल्यानंतर तेथेच होती. नंतर या अवकाशवीरांचे वास्तव्य पूर्ण झाल्यानंतर त्याच कुपीत बसून ते परत आले. यात खूप मोठ्या प्रमाणावर पैशांची बचतही झाली आहे.

यापूर्वी नासाचे अवकाशवीर अशाच पद्धतीने २४ जुलै १९७५ रोजी पॅसिफिकमध्ये अवकाशकुपीतून परतले होते. ही अवकाशकुपी वेग कमी करत पृथ्वीच्या वातावरणात येते व नंतर अलगदपणे समुद्रात पाडली जाते. आताच्या मोहिमेत डग हर्ले व बॉब बेनकेन हे स्पेस एक्स ड्रॅगन कॅप्सूलच्या मदतीने परत आले असून शनिवारी ते अवकाशस्थानकातून परतीच्या प्रवासाला निघाले होते. त्यानंतर त्यांची ही अवकाश कुपी मेक्सिकोच्या आखातातील पेन्साकोला येथे उतरली.

एका विशिष्ट उंचीवर आल्यानंतर अवकाशकुपीचे पॅराशूट खुले करण्यात आले त्यामुळे अवतरण सुरक्षित झाले. स्पेस एक्स कंपनीने अवकाशवीरांना आणण्यासाठी परिचारिका व डॉक्टरांचा समावेश असलेले खास जहाज तयार ठेवले होते. स्पेसएक्सच्या मुख्यालयातून अवकाशवीरांचे स्वागत करण्यात आले. गेल्या काही महिन्यात ज्या घटना झाल्या त्या भारावून टाकणाऱ्या होत्या, असे अवकाशवीर हर्ले यांनी सांगितले. स्पेस एक्सचे प्रमुख मस्क हे कॅलिफोर्नियातील हॉथोर्न येथील मुख्यालयातून ह्यूस्टनला अवकाशवीरांच्या स्वागतासाठी गेले होते. त्यांनी सांगितले की, मी धार्मिक प्रवृत्तीचा नाही पण मी यशासाठी प्रार्थना केली होती. अवकाशवीरांचे पृथ्वीवरचे पुनरागमन हे अवघड असते, त्यात अनेक धोके असतात.

अवकाशकुपी उतरल्यानंतर...

अवकाशकुपीच्या अवतरणाचा श्वास रोखायला लावणारा कार्यक्रम काही मिनिटात संपला. त्यानंतर १५ फुटांची कुपी स्पेस एक्सच्या जहाजावर दिमाखात तरंगत होती. नंतर अवकाशवीरांना सुरक्षित ठिकाणी नेण्यात आले. त्यांना करोनाचा धोका होऊ नये यासाठी आधी त्यांची वैद्यकीय तपासणी करून हेलिकॉप्टरने पेन्साकोला व नंतर ह्यूस्टनला नेण्यात आले. अध्यक्ष ट्रम्प व उपाध्यक्ष माइक पेन्स यांनी परत आलेल्या दोन्ही अवकाशवीरांचे स्वागत केले आहे. दोन महिन्यांनंतर अवकाशवीर सुखरूप परतले हे मोठे यश आहे व हा आनंदाचा क्षण आहे, असे ट्रम्प यांनी म्हटले आहे.

मोहिमेचे वैशिष्ट्य

नासाच्या नेतृत्वाखाली खासगी कंपनीने पहिल्यांदाच समानव अवकाश मोहीम यशस्वी केली असून त्यातून खासगी अवकाश पर्यटनाचा मार्ग खुला झाला. यामुळे अमेरिकेची स्पेस शटल बंद झाल्यानंतरचे रशियावरचे अवलंबित्व संपले. आता त्यासाठी रशियाला लाखो डॉलर्स द्यावे लागणार नाहीत.

NOTICE

I Bimla Devi Rungta, holding 52 shares of Reliance Industries Limited, Registered office:3rd Floor, Maker Chambers IV,222, Nariman point, Mumbai - 400021, Folio No.031678943 bearing Share Certificate No.66901666, 4060400 and 12785084 with distinctive nos. from 6895802198 to 6895802223, from 64417299 to 64417318 and from 257568046 to 257568051, consisting 26, 20 and 6 shares respectively are lost and I have applied to the company for issue of duplicate share certificates. The public is hereby warned against purchasing or dealing in anyway with the share certificates. The company may issue duplicate share certificates if no objection is received within 15 days of the publication of the advertisement, after which no claim shall be entertained by the company in that behalf.

Place: Surat Bimla Devi Rungta
Date: 04/08/2020 Folio : 031678943

न्यायालयाचा अवमान नाहीच - प्रशांत भूषण

पीटीआय, नवी दिल्ली

मतांची अभिव्यक्ती कितीही स्पष्ट, मान्य न होण्यासारखी आणि काहीजणांसाठी अप्रिय अशी असली, तरी त्यामुळे न्यायालयाचा अवमान होऊ शकत नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने जारी केलेल्या कारणे दाखवा नोटिशीला सोमवारी दिलेल्या उत्तरात ॲड. प्रशांत भूषण यांनी म्हटले आहे.

प्रशांत भूषण यांच्या ट्विटरवरील विधानांमुळे सकृतदर्शनी न्यायदानाची अपकीर्ती झाली आहे असे मत व्यक्त करून, त्यांच्या २ कथित बदनामीकारक वक्तव्यांबद्दल सर्वोच्च न्यायालयाने २२ जुलैला त्यांना नोटीस जारी केली होती. या प्रकरणाची सुनावणी ५ ऑगस्टला होणार आहे.

आपल्या वकील कामिनी जैस्वाल यांच्यामार्फत दाखल केलेल्या १४२ पानांच्या शपथपत्रात भूषण यांनी सर्वोच्च न्यायालयाचे अनेक निवाडे, न्यायालयीन अवमानाबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या विद्यमान व माजी न्यायमूर्तींची भाषणे, तसेच लोकशाहीत 'मतभेदांचा कोंडमारा' आणि काही प्रकरणांमध्ये न्यायिक कार्यवाहीबाबत आपली मते यांचा हवाला दिला आहे. आपल्या दोन ट्वीट्सवर आपण कायम असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

घटनेच्या अनुच्छेद १९(१)(अ)मध्ये नमूद केलेल्या भाषण व अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा संदर्भ देऊन, घटनेने जी मूल्ये पवित्र मानली आहेत, त्यांचा हा अनुच्छेद म्हणजे संरक्षक असल्याचे भूषण यांनी नमूद केले आहे.

पश्चिम रेल्वे
शुद्धिपत्र क्र. २

दिनांकित ५.६.२०२० ई-प्रणाली सूचना क्र. डब्ल्यूटीआर/१७/ २०२०/०५ द्वारा जाहिरातकृत निविदेकरिता शुद्धिपत्र क्र. २. निविदा सूचनेचा आयटम क्र. : १; निविदा क्र. : १९६०३४; **आयटमचे वर्णन** : टर्नआऊट आरे. क्र. टी-४२१८ व टी-४८६५ (ट्रायल आयटम) करिता हॉर्नसह ६.२एमएम थिक सीजीआरएसपी; **आयटममध्ये फेरबदल करावयाचे** : निविदा बंद होण्याची तारीख; **पासून** : ५.८.२०२० **ते २७.८.२०२०; निविदा सूचनेचा आयटम क्र.** : ४; **निविदा क्र.** : १९६०३२; **आयटमचे वर्णन** : आरडीएसओ आरे. क्र. टी-८६८२/१ करिता सीएमएस क्रॉसिंग; **आयटममध्ये फेरबदल करावयाचे** : निविदा बंद होण्याची तारीख; **पासून** : २२.७.२०२० **ते २५.८.२०२० पर्यंत; आयटममध्ये फेरबदल करावयाचे** : सेक्शन-सी; **पासून** : विद्यमान **ते सुधारित सेक्शन-सी; www.ireps.gov.in** यावर अपलोड करण्यात आले आहे.

आम्हाला लाइक करा facebook.com/WesternRly 01

भारत सरकार
भाभा अणू संशोधन केंद्र
कार्मिक विभाग
निविदा सूचना

संदर्भ : बीएआरसी/१०/०१/२०२०-एस अॅण्ड एमआयएस/ बीएआरसीमधील कम्प्युटर आणि त्यांचे पेरीफेरल्स यासाठी व्यापक वार्षिक देखभालीचे कंत्राट

मुख्य प्रशासकीय अधिकारी (पी), भाभा अणू संशोधन केंद्र, सेंट्रल कॉम्प्लेक्स, तुर्भे, मुंबई- ४०००८५ हे नामांकित कम्प्युटर देखभाल कंत्राट एजन्सींकडून सुमारे ६९०० पीसीज, २५० लॅपटॉप्स, ४२० डेस्कजेट प्रिण्टर्स, १० डॉट मॅट्रिक्स प्रिंटर्स, १९०० लेसरजेट प्रिंटर्स, १५०० एमएफडीज आणि २५० स्कॅनर्सकरिता आवश्यक असलेल्या वार्षिक देखभाल कामासाठी दोन भागांमधील मोहोरबंद निविदा मागवीत आहेत. **कामाचा अंदाजित खर्च आहे रु. १,००,००,०००/-** आणि **इसारा रक्कम ठेव आहे रु. २,००,०००/- कंत्राटाचा कालावधी असेल एक वर्ष. निविदा कागदपत्रे २०.७.२०२० पासून बीएआरसी वेबसाइटवर उपलब्ध राहतील.**

अधिक तपशिलांसाठी कृपया आमच्या वेबसाइटला **www.barc.gov.in** मध्ये भेट द्या.

अयोध्या सज्ज

(पान १ वरून) यादीतील काही नावे वगळण्यात आली असून, फक्त १७५ जण सोहळ्यात सहभागी होतील. त्यापैकी १३५ संत-महंत असून, उर्वरित ४० विशेष पाहुणे असतील, असे ट्रस्टचे महासचिव चंपत राय यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत सांगितले.

अडवाणी, जोशी नाहीत!

भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी आणि उमा भारती हे तिघेही भूमिपूजन समारंभाला उपस्थित राहणार नाहीत. करोनामुळे अयोध्येला न जाण्याचा निर्णय उमा भारती यांनी आधीच जाहीर केला होता. अडवाणी व जोशी यांना फोन करून निमंत्रण देण्यात आले. पण, ९० वर्षांपेक्षा जास्त वयोमान असलेल्या मान्यवरांनी करोनाचा प्रादुर्भाव लक्षात घेऊन अयोध्येला येणे उचित ठरणार नाही. आम्ही त्यातील अनेकांना फोन करून क्षमाही मागितली आहे, असे चंपत राय यांनी सांगितले. प्रत्यक्ष समारंभाला येऊ न शकणाऱ्यांना दूरचित्रसंवाद व्यवस्थेद्वारे सोहळा पाहता येईल. निमंत्रण पत्रिकेवर सुरक्षाकोड असल्याने समारंभाच्या ठिकाणी फक्त निमंत्रितांनाच प्रवेश मिळू शकेल.

मशिदीसाठी जागेचे हस्तांतरण

अयोध्येचे जिल्हाधिकारी अंजू कुमार झा यांनी सोमवारी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मशिदीसाठी पाच एकर जागा सुन्नी वक्फ बोर्डाकडे सुपूर्द केली. अयोध्येपासून २५ किमी अंतरावर गोरखपूर- लखनऊ रस्त्यावर फैजाबाद जिल्ह्यातील धन्नीपूर गावात मशिदीसाठी जागा निश्चित करण्यात आली आहे. मशीद बांधण्यासाठी इंडो-इस्लामिक कल्चरल फाऊंडेशन स्थापन करण्यात आले आहे.

'रामाला मिशा असाव्यात'

प्रभू राम अतुलनीय, पूजनीय पुरुष दैवत होते. आतापर्यंत शिल्पकार, चित्रकार यांनी चुकीच्या पद्धतीने आपल्याला राम दाखवले. निदान अयोध्यामध्ये उभारल्या जाणाऱ्या मंदिरातील मूर्तीमध्ये तरी त्याला मिशा असाव्यात, अशी मागणी मंदिर समितीमधील प्रमुख गोविंदगिरी यांच्याकडे करण्यात आल्याचे संभाजी भिडे यांनी सांगितले.

डाक जीवन बीमा
Postal Life Insurance
टपाल जीवन विमा
भारतीय टपाल विभाग
संचार मंत्रालय

निदेशक, मुंबई जी. पी. ओ. यांचे कार्यालय, मुंबई-४००००१

सार्वजनिक सूचना : खंडित झालेल्या टपाल जीवन/ग्रामीण टपाल जीवन विमा पॉलिसींचे पुनरुज्जीवन करण्याकरिता

पोस्ट ऑफिस लाइफ इन्शुरन्स नियम २०११ मधील अटी व शर्तींमध्ये केलेल्या सुधारणेच्या अनुषंगाने अधिसूचना क्र. ०२-०१/२०११/एल आय दिनांक **३०.०६.२०२०** प्रमाणे टपाल जीवन/ग्रामीण टपाल जीवन विमा पॉलिसीधारकांना अशी माहिती देण्यात येत आहे की, **पहिल्या अदा न झालेल्या प्रीमियमच्या तारखेपासून ५ वर्षांच्या अखंड कालावधीसाठी बंद/खंडित, ०१.०९.२०२० रोजी/नंतर पॉलिसी पुनरुज्जीवित करण्यास अपात्र ठरतील.** एक शेवटची संधी म्हणून, शेवटच्या प्रीमियमच्या तारखेपासून ५ वर्षांची मर्यादा ओलांडणाऱ्या पॉलिसींना **३१.०८.२०२० पर्यंत पुनरुज्जीवन करण्यासाठी एक खिडकी प्रक्रिया तारीख वाढविण्यात आली आहे,** जेणेकरून ती पॉलिसी चांगल्या आरोग्याच्या वैद्यकीय प्रमाणपत्राच्या अधीन असेल. अशा पॉलिसींचे पॉलिसीधारक ज्यांना विम्याचा लाभ घेण्यासाठी पॉलिसी पुनरुज्जीवित करावयाच्या आहेत, त्यांनी जवळच्या कोणत्याही मुख्य टपाल कार्यालयाला अथवा टपाल जीवन विमा केंद्रीय प्रक्रिया केंद्राला लेखी अर्ज करू शकता.

दिलेल्या तारखेनंतर म्हणजे ३१.०८.२०२० नंतर अशा पॉलिसी पुनरुज्जीवित केल्या जाणार नाहीत आणि त्यानुसार खंडित झालेल्या पॉलिसी नियमानुसार रद्द मानल्या जातील.

(एन. पी. कुड)
उपनिदेशक ट. का.
टपाल जीवन विमा विभाग
मुंबई जी.पी.ओ.-४००००१
फोन नं. : ०२२-२२६९६१०२.

क्र. एफ. १२०२१/१/२०२०- ओ/ओ डीआयआर (एनडब्ल्यूआयसी)- एमओडब्ल्यूआर
भारत सरकार
जलशक्ती मंत्रालय
जल स्रोत, आरडी आणि जीआर विभाग
राष्ट्रीय जल माहिती केंद्र
****
NWIC
अर्जांच्या स्वीकृतीसाठी शेवटच्या दिनांकाचा विस्तार

रोजगार वार्ताच्या **१६-२४, मे २०२०** ची आवृत्ती (ई-पब्लिकेशन) आणि अन्य दैनंदिन वृत्तपत्रांत २४, मे २०२० रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या पदांच्या परिपत्रकाच्या अनुसार जल स्रोत, आरडी आणि जीआर विभाग, जल शक्ती मंत्रालयाच्या अधीन असलेल्या राष्ट्रीय जल माहिती केंद्र (एनडब्ल्यूआयसी) कार्यालयामध्ये नियुक्तीसाठी (अंशकालीन कंत्राटासह) खालील पदे (सामान्य केंद्र सेवा, गट ए, राजपत्रित, मंत्रालयीन नसलेले) पदे भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

अ. क्र.	पदांची नावे	पदांची संख्या	पे लेवल/स्केल
१	संयुक्त संचालक	०२	लेवल- १२ : ७ व्या सीपीसी अन्सुअर पे मॅट्रिक्सच्या, रु. ७८००-२०९२००/-
२	उपसंचालक	०३	लेवल- ११ : ७ व्या सीपीसी अन्सुअर पे मॅट्रिक्स १२, रु. ६७७००-२०८७००/-
३	साहाय्यक संचालक	०४	लेवल- १० : ७ व्या सीपीसी अन्सुअर पे मॅट्रिक्स १२, रु. ५६१००-१७७५००/-

२. अर्जाच्या सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक ज्याचा विस्तार १४.७.२०२० रोजी विस्तार करण्यात आला होता तो आता १२.९.२०२० पर्यंत वाढविण्यात आला आहे. **सर्व अन्य अटी आणि शर्ती पूर्वीप्रमाणेच राहतील.**

३. सामान्य शर्ती, पात्रता निकष, अर्जाचा नमुना आणि अन्य तपशील जल स्रोत, आरडी आणि जीआर विभागाच्या संकेतस्थळावर म्हणजेच **www.mowr.gov.in** वरील **'व्हेकेन्सीज'** शीर्षकाच्या अंतर्गत उपलब्ध आहेत. इच्छुक पात्र अधिकारी/उमेदवार विहित स्वरूपामधील अर्ज योग्य पद्धतीद्वारे उपरोक्त दिनांकाला १२.९.२०२० सादर करावे.

सही/-
(अरुण कुमार गुरंग)
अव्वल सचिव (प्रशासन) एनडब्ल्यूआयसी
दूर. : २९५८३२०३ (कार्या)

डीएव्हीपी-४५१२२/११/०००३/२०२१

शैक्षणिक धोरण कृती आराखड्याच्या प्रतीक्षेत

(पान १ वरून) शिफारशी लागू करण्यासाठी किती निधी लागेल अशा विविध घटकांचा समावेश अंमलबजावणी दस्तावेजांमध्ये असेल.

'परख' यंत्रणा

दहावी आणि बारावीसाठी बोर्डाची परीक्षा बंद का केल्या नाहीत, या प्रश्नावर पोखरियाल म्हणाले, बोर्डाची परीक्षा वर्षातून दोनदा होईल. पहिली परीक्षा ही मुख्य परीक्षा असेल. त्यात मिळणाऱ्या गुणांबाबत विद्यार्थी समाधानी नसेल आणि त्याला सुधारणा करण्याची गरज भासत असेल तर त्याच वर्षी पुन्हा परीक्षा देता येऊ शकेल. नव्या पद्धतीत कोचिंग क्लासेसचे महत्त्वच संपून जाईल. आवडीचे विषय निवडता येतील. या परीक्षेतून विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता व कौशल्ये तपासली जातील. विद्यार्थ्यांचे मूल्यमापन कसे करायचे हे ठरवणारी 'परख' ही यंत्रणा असेल.

शुल्कनिश्चिती

शुल्कनिश्चिती हाही महत्त्वाचा मुद्दा असून शालेय व उच्च शिक्षणाचे व्यापारीकरण रोखले जाईल, असा दावाही त्यांनी केला. बहुस्तरीय यंत्रणेतून शुल्कनिश्चितीची प्रक्रिया नियंत्रित केली जाईल. शालेय शिक्षणाच्या प्रत्येक टप्प्यावर शाळांना त्यांचा दर्जा स्वयंघोषित करावा लागेल. त्यावर राज्य शालेय दर्जा प्राधिकरणाचे नियंत्रण असेल. शाळांच्या दर्जाची माहिती प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर असेल. उच्च शिक्षणातही हीच पद्धत अवलंबली जाईल. खासगी उच्च शिक्षण संस्थांच्या दर्जानुसार त्यांची वर्गवारी करून शुल्क निश्चित केले जाईल. ही प्रक्रिया पूर्ण पारदर्शक असेल व शुल्कावर कमाल मर्यादा असेल. प्रवेशावेळी शुल्कात अनियमित वाढ केली जाणार नाही. सामाजिक बांधिलकीने शैक्षणिक संस्था कार्यरत राहतील. त्याचबरोबर संस्था चालवण्यासाठी संयुक्तिक आर्थिक स्रोतही असेल याचा विचार केला जाईल, असे पोखरिया यांनी स्पष्ट केले.

IDEMI
प्रौद्योगिकी केंद्र, मुंबई
INSTITUTE FOR DESIGN OF ELECTRICAL MEASURING INSTRUMENTS
MINISTRY OF MICRO, SMALL & MEDIUM ENTERPRISES, GOVERNMENT OF INDIA
MSME - TECHNOLOGY CENTRE, MUMBAI
ISO: 9001-2015 | NABL ISO:IEC 17025:2017
IDEMI A Govt. of India Society

DIPLOMA ADMISSIONS FOR THE YEAR 2020 - 2021
AICTE Approved & MSBTE Equivalent 3 Years Diploma Courses

COURSE NAME	FULL TIME PART TIME	QUALIFICATION	AGE
Diploma in Tool & Die Making (Mechanical)	FULL TIME / PART TIME	10th standard with Science & Maths or equivalent with 55% marks in aggregate (45% for belonging to SC/ST Category)	15 - 18 years as on 01/08/2020 (3 years relaxation for SC / ST candidates as per AICTE norms.)
Diploma in Robotics & Mechatronics	FULL TIME		
Diploma in 3D Animation & Graphics	FULL TIME		

Note: Fulll Time Course Duration 3 Years, & Part Time Course Duration 4 years. Direct Second year Admission to Diploma in Tool & Die Making & Diploma in Robotics & Mechatronics.
Eligibility: 12th Science / ITI Passed / HSC Vocational (12th MCVC)

Note: The above schedule / Procedure for selection may change subject to COVID-19 situations and directives from appropriate competent authorities.

Application forms available at www.idemi.org

IDEMI, Eastern Express Highway, Opp. Everard Nagar Bus Stop, Chunabhatti
Sion, Mumbai - 400 022 Tel.: 022 2405 0301/2/3/4 Mob.: 7021221498 / 9405040524 / 9821473895
Fax: 022 - 2405 0016, E-mail: training@idemi.org website: www.idemi.org

विशिष्ट विचारधारेच्या लोकांचा संस्कृतला विरोध!

(पान १ वरून) या भाषेतील विविध शास्त्रांचे ज्ञानही आत्मसात करणे आवश्यक आहे. संस्कृत भाषेच्या अध्ययनाने व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो. भाषा, संस्कार, विचार, संस्कृती, कला, विज्ञान आदीचे भांडार म्हणजे संस्कृत भाषा होय, असेही ते म्हणाले.

उदय सामंत म्हणाले की, संस्कृत भाषा ही मातृभूत असून महाराष्ट्रात तिचा सन्मान करणे आवश्यक आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांनीही संस्कृत भाषेचे महत्त्व जाणले होते. त्यामुळे विद्यार्थी आणि समाजापर्यंत ही भाषा अधिकाधिक पोहोचवली पाहिजे.

स्वागतपर भाषण संस्कृत महोत्सवाचे समन्वयक प्रो. कृष्णकुमार पांडे यांनी केले, तर प्रास्ताविकातून श्रीनिवास वरखेडी यांनी कार्यक्रमाची माहिती दिली. या वेळी राष्ट्रीय संस्कृत संस्थेचे माजी कुलगुरू व्ही. कुटुंबशास्त्री यांना 'प्राच्यविद्यावाचस्पती' या उपाधीने सन्मानित करण्यात आले.

MCXCCL
मल्टी कमोडिटी एक्स्चेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय :- एक्स्चेंज स्क्वेअर, सीटीएस २५५, सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पू.), मुंबई-४०० ०९३.
सीआयएन : यू७४९९९एमएच२००८पीएलसी१८५३४९; ईमेल आयडी : **ig-mcxccl@mcxccl.com;** वेबसाइट : **https://www.mcxccl.com**

१२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची (एजीएम) सूचना

याद्वारा सूचना देण्यात येते की, कंपनीची बारावी एजीएम दिनांकित २५ जुलै, २०२० एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार कामकाजावर विचारविनिमय करण्याकरिता व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (''व्हीसी'')/ अदर ऑडिओ-व्हिज्युअल मीन्स (''ओएव्हीएम'') द्वारा गुरुवार, २७ ऑगस्ट, २०२० रोजी दु. ०३.०० वा. घेण्यात येणार आहे. एजीएम निगम कामकाज मंत्रालय आणि सिक्युरिटीज अॅण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया यांच्याद्वारा निर्गमित केलेल्या परिपत्रकांच्या अनुसार ''व्हीसी''/ ''ओएव्हीएम''द्वारा घेण्यात येणार आहे.

उक्त परिपत्रकांच्या अनुसार, वित्तीय वर्ष २०१९-२० करिता वार्षिक अहवालासह एजीएमची सूचना सर्व सदस्यांना कंपनीकडे नोंदणीकृत असलेल्या त्यांच्या ईमेल पत्त्यांवर ०३ ऑगस्ट, २०२० रोजी इलेक्ट्रॉनिक प्रणालीत पाठविण्यात आल्या आहेत. एजीएमची सूचना व वार्षिक अहवाल **https://www.mcxccl.com** या कंपनीच्या वेबसाइटवरसुद्धा उपलब्ध आहेत. एजीएममध्ये उपस्थित राहण्याबाबत सूचनांची उक्त एजीएम सूचनेमध्ये तरतूद करून देण्यात आली आहे.

एजीएममध्ये विचारविनिमय करण्यात येणाऱ्या कामकाजाच्या आयटम्ससंबंधित कागदपत्रे सभेच्या तारखेपर्यंत पाहणीकरिता उपलब्ध असतील.

मल्टी कमोडिटी एक्स्चेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
मंदार कुलकर्णी
कंपनी सचिव

स्थळ : मुंबई
तारीख : ०३ ऑगस्ट, २०२०

लोकसत्ता क्लासिफाइड्स
सगळ्यांकरिता सर्वकाही

मालमत्ताविषयक

फक्त दाते- लँड्स एक्सपर्टस, दादर (प.) तुम्हाला कायदेशीर शेतकरी करतात. रायगड जिल्ह्यातील जमिनी डिस्काउंट, EMI ने, ऑनलाईन विकतात, खरीदतात. भारतभर सेवा. 9324371568/ 8433557110/ 9372192748. www.dateylands.com 0070709071-3

ट्यूटर्स

ज्ञानसमूद्धी होमट्यूशन (शिक्षक घरी येऊन/ Online शिकवतील). 5th to 12th All Board (PCMB+ JEE+ NEET) Degree-Diploma Engineering च्या विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी. पालकांनी/ शिक्षकांनी संपर्क साधावा. 8424870450/ 9892580206. 0070708483-1

शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी. खर्डीकर क्लासेस, सातवी नापास..? डायरेक्ट दहावी. अकरावी नापास..? डायरेक्ट बारावी. डोंबिवली, ठाणे, बदलापूर, दिवा, टिटवाळा- 9820627580, 9820904646. 0070703017-4


जाहिरातविषयक

 # न्यूझपेपर, टीव्ही, रेडिओवर जाहिरात बुकिंग करण्यापूर्वी आमच्या अनुभवी प्रतिनिधींचा सल्ला घ्या. भरपूर नफा कमवा आणि ब्रँड मोठा करा. संपर्क: 9820319546. 0070648780-5

किऑन पब्लिसिटी- अधिकृत जाहिरात एजन्सी. लोकसत्तासह सर्वच वर्तमानपत्रांमध्ये सर्व प्रकारच्या जाहिराती योग्य दरात Email, WhatsApp द्वारेही स्वीकारतो. 9653683498/ 9920992393/ 0222825307. 0070703019-4

हार्दिक शुभेच्छा

१०७ व्या वाढदिवसाच्या शुभेच्छा



श्री. शंकर द. चौबळ

प्रेमाचे हे वाहती वारे
आनंदाचा झरा खळखळे
वात्सल्याचे पुरहि आले
परमेशाचे अमोल लेणे
तुमच्या संगे आम्हा लाभले

चौबळ कुटुंबीय व
आप्त मित्रांकडून

0070710322-1-1

शैक्षणिक



नालंदा dance research centre's
nalanda nritya kala mahavidyalaya
Affiliated to UNIVERSITY OF MUMBAI
RECOGNISED BY UGC (NAAC Accredited)
JOB ORIENTED DANCE DEGREES AND DIPLOMAS OF UNIVERSITY OF MUMBAI
Bachelor of Performing Arts (Dance)
Bharata Natyam & Mohini Attam.
Admission after 10th S.S.C. & 12th H.S.C.
We will award 5 Freeships to Meritorious Students
Master of Performing Arts (Dance)
Bharata Natyam, Mohini Attam, Kathak.
Certificate, Diploma and Advance Diploma in Dance (Kathak & Odissi)
Admissions after 12th, HSC in Certificate and After Degree in Diploma
Certificate in Folk Dances of Maharashtra and Gujarat of University of Mumbai
Admission after 12th H.S.C.
Plot A-7/1, N.S. Road No.10, J.V.P.D. Scheme, Vile Parle (W), Mumbai – 400 049.
e-mail:nnkm1973@gmail.com, nalanda1966@gmail.com
DOWNLOAD ADMISSION FORM VISIT AT www.nalandadancecollege.edu.in
Dr. (Smt.) Uma Rele, Principal
Dr. (Smt.) Kanak Rele, Founder Director

भविष्यविषयक

श्रीनाथ ज्योतिष पतिदुःख, लवमॅरेज, लग्नविलंब, आपला मुलगा/ मुलगी कोणाच्याही वशमध्ये आहे, प्रेमामध्ये विक्षिप्त आहे (मालाड) 9833390898/ 9920991344/ 022-28898500. 0070708977-1

पाहिजेत

हेईडलबर्ग सीडी मशीनसाठी प्रिंटर, बॉयलर, फिडरमॅन, प्रोडक्शन मॅने